**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/३५/२०२३

दिनांक -२४.०२.२०२५

**प्रति,**

१. विनोद राम माने

सर्व रा. विठठल नगर, जत, ता. जत, जि. सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. बाळासाहेब आप्पा माने

२. बबाबाई ऊर्फ आप्पा माने

३. शालाबाई मारुती वाघमोडे

अ.क्र.१ रा.विठठलनगर,जत ता.जत जि.सांगली

अ.क्र.२ रा.माने वस्ती,जत ता.जत जि.सांगली

अ.क्र.३ रा.बिरनाळ ता.जत जि.सांगली ....... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. जत, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ६७१/४, या मिळकत प्रकरणी मंडळ अधिकारी जत यांनी तक्रार.र क्रमांक. ०२/२०२३, दिनांक ५.०५.२०२३, अन्वये दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रीतसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तूत अपिलकामी नोटीस बजाऊन दिनांक ०८.१०.२०२४, ०४.०२.२०२५, ०६.०२.२०२५, अन्वये म्हणणे मांडणेकामी वारंवार संधी देणेत आली आहे. तसेच प्रकरणी अपिलार्थी यांना सुनावणीकामी कळवून देखिल उक्त सुनावणी दिनांकास हजर रहिले नाहीत. त्याचबरोबर प्रस्तुत अपील चालविणेकामी अपिलार्थी हे काही एक प्रयत्न करीत नसलेचे दिसून येत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे अपील अपिलार्थी यांना चालविणेचे स्वारस्य दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३२ अन्वये प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकणे आवश्यक असलेचे माझे मत झालेने मी,अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील चालविणेत स्वारस्य दिसून येत नसल्याने प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.**

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)

**उपविभागीय अधिकारी**

**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत

दिनांक -२४.०२.२०२५

उप विभागीय अधिकारी, जत उपविभाग, जत

प्रत-तहसिलदार,जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.